# चिखलदरा ठाणेदारांसह पाच अंमलदार मुख्यालयी अटॅच

## रेट्याखेडा प्रकरणात पोलिस अधिक्षकांकडून कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** - चिखलदरा तालुक्यातील रेट्याखेडा येथे 30 डिसेंबर 2024 रोजी एका वृध्द महिलेची धिंड काढण्यात आली होती. यामध्ये प्रकरणाची गंभीरता न ओळखता पोलिसांकडून कसूरी झाल्याचा ठपका ठेवत पोलीस अधिक्षकांनी चिखलदरा ठाणेदारांसह पाच अंमलदारांना मुख्यालयी अटॅच केले आहे.

घटनेच्या दिवशी पहाटे चार वाजता शौचासाठी घराबाहेर निघालेल्या 77 वर्षीय आदिवासी वृद्धेवर काही गावकऱ्यांनी जादू टोण्याचा आड घेत तिला दोरखंडाने बांधून मारहाण केली. गरम लोखंडी सळाखीचे चटके दिले, मिरचीची धुनी दिली, तोंडाला काळे फासले, माणसाचे आणि कुत्र्याचे मूत्र पाजले, एवढ्यावरही हा अघोरी प्रकार थांबला नाही. त्या वृद्धेला डोक्यावर गाठोडे घेऊन मारत गावभर दिंड काढली

याप्रकरणी 5 जानेवारी रोजी या वृध्देच्या सुनेने चिखलदरा पोलिसात तक्रार नोंदविली होती, परंतू पोलिसांनी फक्त वृध्देला मारहाण केल्याप्रकरणी तक्रारीनुसार भारतीय न्याय संहितेच्या 118(1),352,351(2),351(3),3/5 अन्वये गुन्हे दाखल केले. मात्र याप्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली नव्हती. पोलिसांनी घटनास्थळी जावून कुठलीही चौकशी केली नाही. वृध्देची धिंड काढल्याचे छायाचित्र जेव्हा पुढे आले, तेव्हा जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षकांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेत, याप्रकरणी अंधश्रध्दा निर्मुलन कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करुन मुख्य आरोपी माजी सरपंच तथा बडतर्फ पोलीस पाटील बाबू झापू जामुनकर (वय 45), सायबु भुऱ्या चतुर (वय 32), रामजी भूऱ्या चतुर (वय 42), साबुलाल तुंबा चतुर (वय 32, सर्व रा.रेट्याखेडा) यांना अटक केली.

### चौकशी समितीचा अहवाल

याप्रकरणी एक चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. ज्या समिती चिखलदरा पोलिसांची गंभीर चूक नाही, मात्र चूक झाल्याचा ठपका ठेवल्याची माहिती आहे. याप्रकरणाच्या अनुषंगाने चिखदर्याचे ठाणेदार आनंद पिदुरकर यांची पोलिस अधीक्षक कार्यालयातील कल्याण शाखेत बदली करण्यात आली आहे. सहायक पोलीस उपनिरीक्षक रामू भिलावेकर, हेड कॉंस्टेबल दिपक सोनाळकर, हेड कॉंस्टेबल भिमसिंग उईके, हेड कॉंस्टेबल श्रीकांत खानंदे, हेड कॉंस्टेबल प्रमिला जामकर यांना मुख्यालयी अटॅच करण्यात आले आहे.

# ग्रामिण पोलिस दलातील 'पीआय', 'एपीआय'चे खांदेपालट

## पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांचे आदेश जारी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.2 )**- ग्रामीण पोलीस दलातील नऊ पोलीस निरीक्षक व दोन साहाय्यक पोलीस निरीक्षकांची बदलीचे आदेश 1 फेब्रुवारी रोजी पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी जारी केलेत. या फेरबदलमुळे ग्रामिण पोलिसांच्या वर्तुळात विविध चर्चा सुरु आहेत.

यामध्ये अचलपूर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्याकडे सायबर पोलीस ठाण्याचे प्रमुखपद देण्यात आले आहे. आतापर्यंत सायबर ठाणे सांभाळणारे पोलीस निरीक्षक श्रीराम लांबाडे यांच्याकडे आर्थिक गुन्हे शाखेचा चार्ज देण्यात आला आहे. यापूर्वी श्रीराम लांबाडे हे सायबर व आर्थिक गुन्हे शाखा या दोन्हींचा कार्यभार पाहत होते. बीडीडीएसचे पोलीस निरीक्षक प्रशांत मसराम यांची चिखलदराचे ठाणेदार म्हणून बदली करण्यात आली आहे. त्याचवेळी चिखलदराचे ठाणेदार आनंद पिदूरकर यांची बदली पोलीस कल्याण शाखा येथे करण्यात आली. तर नियंत्रण कक्षातील अनिल सिरसाट यांच्याकडे बीडीडीएसचा प्रभार देण्यात आला आहे. अमरावती पोलीस आयुक्तालयात गुन्हे शाखेत कार्य केलेले पोलीस निरीक्षक अर्जुन ठोसरे यांची गतवर्षी अमरावती ग्रामीणमध्ये बदली झाली होती. त्यावेळी त्यांच्याकडे होम डीवायएसपीचा प्रभार देण्यात आला. त्यांना आता वरूडची ठाणेदारकी देण्यात आली. त्याचवेळी वरूडचे ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांची बदली नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे.

चांदूरबाजारचे ठाणेदार सूरज बोंडे यांच्याकडे होम डीवायएसपीचा प्रभार देण्यात आला आहे. तर पोलीस कल्याण शाखा येथील पोलीस निरीक्षक संतोष ताले यांची बदली चांदूरबाजारचे ठाणेदार म्हणून करण्यात आली आहे. त्याचवेळी खल्लारचे साहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल जंजाळ यांची बदली चांदूरबाजार येथे करण्यात आली आहे. तर चांदूरबाजाचे साहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र बारड यांची बदली खल्लार येथे करण्यात आली आहे.



# लालखेड शेतशिवारात जुगारावर धाड

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.2 )**- चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन हद्दीतील लालखेड शेतशिवारात जुगारावर धाड टाकून 5 लाख 96 हजार 270 रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची कारवाई 1 फेब्रुवारीला सायंकाळी 4=10 ते 5 वाजताच्या दरम्यान चांदूर रेल्वे पोलिसांनी केली. यात 10 आरोपींना ताब्यात घेतले तर तिघे घटनास्थळावरून फरार झाले.

पोलीस सुत्रांच्या माहितीनुसार, मालखेडचे बिट जमादार पो.हे.कॉं. शिवाजी घुगे यांच्या सोबत पीएसआय नितेश आझडे, पीएसआय नंदलाल लिंगोट, पो.हे.कॉं. प्रविण मेश्राम, पो.हे.कॉं. गजानन वाघमारे, ना.पो.कॉं. प्रशांत ढोके, पो.कॉं. रविंद्र भुताडे, पो.कॉं. मंगेश गेडाम, पो.कॉं. अक्षय नन्नावरे ही चमु ग्राम मालखेड (रेल्वे) येथे पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, ग्राम मालखेड ते लालखेड दरम्यान असलेल्या एका पडीत शेतात काही इसम जुगार खेळ खेळत आहे, अशा माहीती वरुन सदर पोलीस स्टॉप लालखेड शेत शिवारात गेले असता त्याठिकाणच्या जुगारावर रेड केली. याठिकाणावरून आरोपी विजय अंसा चव्हान (वय 36 वर्ष, रा. लालखेड), संतोष हेमराज राठोड (वय 27 वर्ष, रा. कस्तुरा ता. जि. अमरावती), नरेश राजु राठोड (वय 25 वर्ष, रा. लालखेड), चेतन पंजाबराव राठोड (वय 33 वर्ष, रा. सावंगा विठोबा), बादल प्रेमदास चव्हाण (वय 27 वर्ष, रा. लालखेड), मधु माणिक मंजुळकर (वय 27 वर्ष, रा. बासलापुर), अर्जुन जयसिंग राठोड (वय 30 वर्ष, रा. सावंगा विठोबा), दिवाकर किसनराव राऊत (वय 35 वर्ष रा. सावंगा विठोबा), किरण बोर्डीग पवार (वय 25 वर्ष, रा. मोगरा ता. जि. अमरावती) व सुरज चिंतामन आडे (रा. लालखेड) यांना ताब्यात घेण्यात आले. तर प्रविण मेश्राम (रा. मालखेड), गोवर्धन राठोड (रा. लालखेड) व प्रफुल बाबुसींग चव्हाण (रा. लालखेड) हे तिघे फरार झाले. आरोपींच्या ताब्यातून नगदी 6 हजार 270 रुपये, 10 मोटरसायकल किंमत 5 लाख 90 हजार रूपये असा एकूण 5 लाख 96 हजार 270 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सर्व आरोपींविरूध्द कलम 12 (अ) मुं.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई ठाणेदार अजय आकरे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली.

**5 लाख 96 हजारांचा मुद्देमाल जप्त**

**10 आरोपी ताब्यात, 3 फरार**

# विद्यार्थ्यांना मारहाण करणाऱ्या शिक्षकाविरुद्ध गुन्हा

## नांदगाव पेठ ठाण्याच्या हद्दीतील आदिवासी आश्रमशाळेतील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** - आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना मारहाण केल्याप्रकरणात एका शिक्षकाविरुध्द 1 फेब्रुवारी रोजी नांदगाव पेठ पोलिसांनी गुन्हा नोंदविला. अविनाश पुंजाजी लोढे (40, रा. गोसावी आदिवासी आश्रमशाळा, नांदगाव पेठ) असे आरोपी शिक्षकाचे नाव आहे. या घटनेची तक्रार एका 16 वर्षीय मुलाने पोलिसात दिली आहे.

पोलिस सुत्रानुसार, तक्रारकर्ता मुलगा हा दहावीचा विद्यार्थी असून तो नांदगाव पेठ येथील गोसावी आदिवासी आश्रमशाळेत राहतो. 26 जानेवारी रोजी उशिरा रात्री तो व त्याचे तेथीलच दोन मित्र असे तिघे अभ्यास करीत होते. त्यावेळी त्यांना भूक लागली. त्यामुळे त्यांनी शिक्षक अविनाश लोढे याला मेसची चावी मागितली. जेवन आटोपल्यानंतर चावी परत करून मध्यरात्री 2 वाजताच्या सुमारास ते तिघे झोपले. दरम्यान, काही वेळाने एका रुममधून मुलांचा जोरजोराने आवाज येत असल्याने शिक्षक अविनाश लोढे हा तेथे गेला. त्यावेळी आठव्या वर्गाच्या रुममधून आवाज येत असल्याचे लक्षात आल्यावर तो तेथे गेला. अन्य रुममधून आवाज येत असल्याने तक्रारकर्ता मुलगा व त्याचे दोन्ही मित्रदेखील बाहेर येऊन बसले. त्यावर जोरजोराने आवाज केल्याचा आरोप करून अविनाश लोढे याने तक्रारकर्त्या मुलाच्या 15 व 16 वर्षीय मित्रांना मारहाण केली.

### थापड मारल्याने कान बधिर

तक्रारकर्त्यां मुलानेदेखील जोरजोराने आवाज केला, या संशयावरुन त्याच्या दोन्ही कानावर थापडांनी मारहाण करण्यात आली. अविनाश लोढे याने मारल्याने आपल्या उजव्या कानाला अधिक मार लागल्याने तो बधीर झाल्यासारखा वाटतोय. कमी ऐकू येत असल्याचे व मानेवर उजव्या बाजूने सूज असल्याने दुखत असल्याचे तक्रारकर्त्या विद्यार्थ्यांने म्हटले आहे. अविनाश लोढे याने आपल्यासह आपल्या दोन मित्रांना मेसच्या हॉलमध्ये नेऊन मारहाण केली. तसेच याबद्दल कोणालाही काही बोलू नका, अशी धमकी दिल्याचे त्याने तक्रारीत म्हटले आहे.

# लैंगिक अत्याचार पिडितेने दिला मुलीला जन्म

## आरोपीला अटक, शिरजगाव कसबा ठाण्याच्या हद्दीतील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** - लग्नाचे आमिष दाखवून एका अल्पवयीन मुलीचे अपहरण केले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यामुळे पिडित मुलगी गर्भवती झाली आणि तिने एका मुलीला जन्म दिला. या घटनेची तक्रार पिडित मुलीने 1 फेब्रुवारी रोजी शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी महेंद्र महादेव जांबू (25, रा. बोराळा, चिखलदरा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

पोलिस सुत्रानुसार, 15 वर्षीय मुलीची मोठी बहीण विवाहित असून ती शिरजगाव कसबा ठाण्याच्या हद्दीतील बहिणीकडे राहते. बहिणीच्या लग्नात पीडित मुलीची ओळख महेंद्रसोबत झाली. त्यानंतर त्यांच्यात मोबाइलवर बोलचाल सुरू झाली. या काळात महेंद्र हा तिला भेटायलासुद्धा येत होता. 1 फेब्रुवारी 2024 रोजी महेंद्र हा तिला भेटायला आला. त्यावेळी त्याने मला तुझ्यासोबत लग्न करायचे आहे, असे म्हणून तिला तेथून पळवून नेले. तो तिला आपल्या घरी घेऊन गेला. तेथे त्याने लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत जबरीने वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यातून तिला गर्भधारणा झाली. त्यामुळे तिने महेंद्रला लग्नाबाबत विचारणा केली. त्यावर त्याने टाळाटाळ केली. दरम्यान, 30 जानेवारी 2025 रोजी पोटात दुखू लागल्याने तिला अचलपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

तेथे प्रसूती होऊन तिने मुलीला जन्म दिला. त्यावेळी पीडित अल्पवयीन असल्याचे लक्षात आल्यावर रुग्णालय प्रशासनाच्या वतीने याबाबत पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी रुग्णालय गाठून तिचे बयाण नोंदविले. त्यावेळी अत्याचाराचा हा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी पीडित मुलीच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी महेंद्रविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# चांदूरबाजार येथे अडीच लाखांची घरफोडी

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,( दि.2 )**- चांदूर बाजारातील निहाजनगर परिसरात अडीच लाखांची घरफोडी झाल्याची घटना 1 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. याप्रकरणात सलिम खान पापा खान यांच्या तक्रारीवरून चांदुरबाजार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदवलिला.

निहाजनगर येथील रहिवासी सलीम खान पापा खान (50) हे काही कामानिमीत्त घराबाहेर होते. दरम्यान चोरांनी त्यांचे घर फोडून बेडरुममधील लोखंडी कपाटातील 1 लाख 50 हजार रुपये रोख व 28 ग्रॅम सोन्याचे दागिने असा एकूण 2 लाख 50 हजार रुपयांचा ऐवज लांबविला. ही बाब लक्षात आल्यावर सलीम खान यांनी चांदूरबाजार ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# मद्यपी पतीची पत्नीला मारहाण

**अमरावती** - दारूड्या पतीने पत्नीला लोखंडी पाइपने मारहाण केली. ही घटना नांदगाव खंडेश्वर ठाण्याच्या हद्दीत 1 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. सिलोडा येथील रहिवासी धनंजय सवटे हा दारू पिऊन घरी गेला. त्यामुळे पत्नीने त्याला दारू पिऊन येत जावू नका, असे म्हटले. त्यावर धनंजयने पत्नीसोबत वाद घालून त्यांना लोखंडी पाइपने मारहाण केली.

# विहिरीत पडलेल्या बिबटच्या शावकाला काढले बाहेर

## शिरजगाव मोझरीच्या मालधूर शेतशिवारात घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )**- शिरजगाव मोझरी स्थित मालधुर शेतविरातील एका विहिरीत रविवारी सकाळच्या सुमारास पाच ते सहा महिन्याचे बिबटचे शावक पडले होते. या बिबटला चांदुररेल्वे वनपरिक्षेत्रातील अधिकारी व कर्मचार्यांनी सुरक्षितरित्या बाहेर काढले. बिबटची वैद्यकीय तपासणी करून, त्याला जंगलाच्या सानिध्यात सोडण्यात येणार होते.

तिवसा तालुक्यातील शिरजगाव मोझरी लगत असलेल्या मालधुर येथील अरविंद साबळे यांच्या शेतात तूर कापणी सुरु होती. दरम्यान काही मजूर वर्ग पाण्यासाठी विहीरीवर गेले असता त्यांना विहिरीतील दगडाच्या कपारीत बिबट असल्याचे आढळून आले. त्यामुळे मजुरांनी याबाबतची माहिती शेतमालक अरविंद साबळे, सतिश साबळे तसेच मोझरीचे सरपंच सुरेंद्र भिवगडे यांना दिली. त्यानंतर त्यांच्या माहितीवरून चांदुररेल्वे वनपरिक्षेत्र कार्यालयातील अधिकारी व कर्मचार्यांनी तत्काळ मालधुर शिवार गाठले. त्यानंतर वनविभागाच्या रेस्क्यू पथकाने बिबटच्या शावकाला सुरक्षितरित्या बाहेर काढून चांदुररेल्वे वनविभाग परिसरात नेले. त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. बिबटचे शावक हे आईसोबत आले असावे आणि विहिरीत पडले असावे, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे या परिसरात बिबट पुन्हा शावकासाठी येण्याची शक्यता आहे.

त्यामुळे बिबटच्या शावकाला पुन्हा नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार आहे. यावेळी तिवसा वनविभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल चौधरी, वनपाल एस.घोडमारे, पायल अंबाडकर, वनरक्षक मनोहर वनवे, वनमजुर गजानन राऊत व रेस्क्यू टिम उपस्थित होती.

### व्यवसायीकांमध्ये भितीचे वातावरण


तिवसा तालुक्यातील मोझरी ते शिरजगाव रस्त्याने असणार्या मालधुर शेतशिवारलगत बिबट दिसल्याची चर्चा गेल्या काही दिवसापूर्वी होती. 8 जानेवारी रात्री दरम्यान अंदाजे अडीच फूट उंच असलेला बिबट दिसल्याची चर्चा पसरली होती. त्यामुळे शिरजगाव ते मोझरी मार्गावरील व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. याविषयीच माहिती वनविभागाला देण्यात आली. वनविभागाने पाहणी झाल्यानंतर बिबटविषयी पुरावे सापडले नाही.

"मालधुर शेतशिवारातील विहिरीत पाच ते सहा महिन्याचे बिबटचे शावक पडले होते. त्याला पंधरा मिनीटात सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर बिबटला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येईल.

**बी.आर.पवार,**
**चांदुररेल्वे वनपरिक्षेत्र अधिकारी.**

# वसंत ऋतुच्या स्वागतासाठी पळस फुलला

## वनातील रंगोत्सोवाला सुरुवात ■ डोळ्यांना सुखाविते पळसाची फुलं





**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट( दि.2 )** - उन्हाळा सुरु झाला असला तरी थंडी अजूनही अंगात असल्यासारखी जाणवत आहे. तर शिशिर ऋतू मावळून आता वसंत बहरायला सुरुवात झाली आहे. अशातच ठिकठिकाणी पळस फुलं उधळताना दिसत आहेत. पळस म्हणजे पलाश वृक्ष, रानाचा अग्नी. इंग्रजीत तर त्याला %फ्लेम ऑफ फॉरेस्ट% असं म्हटलं जातं. वसंत ऋतूत फुललेल्या पळसाचं झाड सर्वांचंच लक्ष वेधून घेतंय. अचलपुर तालुक्यातील डोंगराळ भागात बहरलेली पळसाची झाडे अनेकांना मोहवून टाकत आहेत. उन्हाळा सुरू झाला की, झाडांना पानगळ लागते आणि निष्पर्ण वृक्षांचे सांगाडे पाहवयास मिळतात. अशावेळी उन्हाळ्यातही काही झाडं बहरत असताना पळस लक्ष वेधून घेतो.

पळसाला काळ्या रंगाच्या कळ्या येतात आणि नंतर कळ्यांची फुलं होतात. दरम्यानच्या काळात पानं झडतात. पळसाला जशी पिवळी आणि दुर्मिळ आढळणारी पांढरी फुलंही आढळतात. पण या सुंदर रंगांना गंधही नाही. परंतु पळस फुलला की, संपूर्ण जंगल लाल रंगांनी न्हाऊन निघतं.

पळसाच्या फुलातील मध वेचण्यासाठी असंख्य पक्षी झाडावर येतात. पळसाच्या फुलांपासून रंग देखील बनवला जातो. तसंच ग्रामीण भागात पुर्वी पळसाच्या पानांचा उपयोग पत्रावळीसाठीही केला जायचा हल्ली कुणी लक्ष देत नाही. निसर्गाची ही रंगपंचमी मनाला भुरळ घालते. विशेष म्हणजे प्राचीन काळापासून पळसाचा औषधशास्त्रात औषध म्हणून उपयोग होतो.

### पळसाला पानं तीनचं

पळसाला पानं तीन अशी मराठीत म्हण आहे, पण त्या पानांनादेखील त्रिदेवाचं महत्त्व प्राप्त झालं आहे. पळसाच्या बारीक फांद्या यज्ञात समिधा म्हणून वापरतात. पळसाच्या जंगलातील %प्लासीची लढाई% इतिहासात प्रसिद्ध आहे. पळसाच्या फुलांचा ढग पाण्यात सोडला की, त्याचा नैसर्गिक भगवा रंग तयार होतो. या रंगानेच रंगपंचमी ग्रामीण भागात साजरी होते. शिवाय पळसाच्या बियांचे तेल त्वचेकरिता, डिंक शक्तीकरिता, पानं पत्रावळ्याकरिता, तर पळसाचे लाकूड बांधकामातही वापरण्यात येते. पूर्वीच्या काळी रंगपंचमीच्या दिवशी फुलांचा रंग देखील वापरला जायचा. बाजारात विविध कृत्रीम रंग आल्यामुळे या झाडाकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# 111 ग्रामपंचायतीत होणार पोटनिवडणुका

## 14 तालुक्यात 161 सदस्यांसह 5 सरपंचाचे पद रिक्त

**महासागर प्रतिनिधी**

***अमरावती,(दि.2)–जिल्ह्यात गत वर्षभरापासून रखडलेल्या ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणूका फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. निवडणूक विभागाने आयोगाला रिक्तपदांचा अहवाल पाठविला आहे. त्यानूसार 111 ग्रामपंचायतींमध्ये 131 सदस्य व 5 थेट सरपंच पदाकरीता निवडणूक होणार आहे.***



जिल्ह्यात ग्रामपंचायतींमध्ये निधन, राजीनामा, अपात्र अशा कारणांमूळे रिक्त झालेल्या पदांकरिता पोटनिवडणूक घेणे गरजेचे आहे. मागील एक वर्षापासून सदर ग्रामपंचतींमध्ये पोटनिवडणूका रखडलेल्या आहेत. सुरूवातीला लोकसभा त्यानंतर विधानसभेच्या निवडणुकीमुळे या निवडणुकांना स्थगिती होती. आता या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाल्याने आयोगाकडून फेब्रुवारीच्या 10 तारखेपर्यंत निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याच्या हालचाली सुरू केल्याची माहीती आहे. जिल्हा निवडणूक विभागाला 31 डिसेंबर पर्यंत रिक्त जागांचा अहवाल आयोगाने मागितला होता. सदरचा अहवाल

आयोगाकडे प्राप्त झाल्याने फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात मतदार यादी कार्यक्रम लागण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात सद्या 111 ग्रामपंचायतींमध्ये 161 सदस्य व पाच ग्रामपंचायतींमध्ये 5 थेट सरपंच पदाच्या जागा रिक्त आहेत. त्यामुळे या ग्रामपंचायतींमध्ये आता पोटनिवडणुकीची धूम सुरू होणार आहे.

### 5 ग्रामपंचायतीमध्ये 6 ला निवडणूक

जिल्ह्यात पाच ग्रामपंचायतीमध्ये तीन सरपंच, दोन उपसरपंच पदासाठी 6 फेब्रुवारीला निवडणूक लावण्यात आली आहे. या पाच पदांकरिता एकाचवेळी सकाळी 11 वाजतापासून निवडणूक प्रक्रियेला सुरूवात केली जाणार आहे. यामध्ये भातकुली तालुक्यातील सरपंच पद हे थेट निवडीतून असल्याने येथील निवडणूक रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानंतर खोलापूर ग्रांमपंचायतीची निवडणूक लावली जाईल.

### या ठिकाणी होणार थेट सरपंचांची निवड

तिवसा तालुक्यातील आखतवाडा सरपंचपद महिला नामाप्र करिता रिक्त आहे. वणी ममदापूर सर्वसामान्य महिला, चांदूर बाजार तालूक्यातील सर्फाबाद अनुसूचित जमाती महिला, टाकरखेडा पुर्णा अनुसूचित जमाती व धारणी तालूक्यातील खापरखेडा अनूसुचित जमाती या प्रवर्गाकरिता सरपंच पद रिक्त आहे. अशा पाच ठिकाणी थेट सरपंच पदाकरिता निवडणूक होणार आहे. अमरावती 1,भातकुली 12, नांदगाव खंडेश्वर 9, चांदूर रेल्वे 6, धामणगाव रेल्वे 6, तिवसा 6, मोर्शी 14, वरूड 13, चांदूरबाजार 7, अचलपूर 18,अंजनगाव सुर्जी 8, दर्यापूर 18, चिखलदरा 14,धारणी 26 अशी एकूण 161 पदे रिक्त आहेत.

# एडीसीसी बँकेच्या रोकड वाहनाची मध्यप्रदेशात सैर

## रोकड घेवून जाणारी व्हॅन भरकटली कशी ? चौकशी गरजेची

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि.2 )** – अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेची (एडीसीसी) रोकड पोहोचवणारी एमएच 27/ बीएक्स 6642 या क्रमांकाचे वाहन मध्य प्रदेशाची सैर करुन पुन्हा महाराष्टात येत असल्याने नेमका हा रूट कसा ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. याप्रकरणी चौकशी व्हावी, अशी मागणी बँकेच्या ग्राहकाकडून केली जात आहे.




जिल्हा मध्यवर्ती बँकेचा शाखेचा रुपाने संपूर्ण जिल्ह्यात विस्तारलेली आहे. धारणी व चिखलदरा तालुक्याच्या अनेक गावांपर्यंत बँकेच्या शाखा आहे. या बँकेच्या मुख्य कार्यालयातून या शाखांना रोकड पुरविली जाते. शनिवार (दि.1) एमएच 27/ बीएक्स 6642 या क्रमांकाची गाडी मध्यप्रदेशाच्या खोमाई या ठिकाणी दिसल्याने नेमका या वाहनाचा हा रूट कसा ? की अधिकारी आपल्या मर्जी नुसार या मार्गी जात आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आम्ही चुरणी या ठिकाणी जात असल्याचे सांगितले. चूरणी जाण्यासाठी परतवाडा वरून दोन मार्ग आहे. तसेच तो रोड देखील चांगला आहे. मात्र हा मध्यप्रदेशचा मार्ग कसा काय तयार करण्यात आला हा एक संशोधनाचा भाग आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेचा हा प्रकार अध्यक्ष यांच्या लक्षात नाही का ? हा देखील प्रश्न आहे. या संदर्भात जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्यासोबत भ्रमणध्वनीवर संपर्क केला असता संपर्क झाला नाही तर संचालक याप्रकरणी चौकशीची मागणी करतील का ? हा प्रश्न आता सध्या उपस्थित आहे. मात्र महाराष्ट्राची गाडी मध्यप्रदेश मार्गे परत महाराष्टात येते हा काही प्रकार न समजण्यासारखा आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी

# आर.जी.देशमुख कृषी विद्यालयात छात्रसेना दिन



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.2 )**– तालुक्यातील वाठोडा येथे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंती निमित्त आर.जी. देशमुख कृषी विद्यालयात छात्रसेना दिन नुकताच पार पडला झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिलकुमार देशमुखए प्रमूख अतिथी म्हणून संस्था सचिव अश्विन देशमुख, माजी उपसरपंच मनोज बाडे, माजी विद्यार्थी व सैन्यामध्ये कार्यरत गणेश चढोकर, शैलेश उघडे, अभिषेक पवार, गौरव भुसारी, ऋषिकेश माकोडे उपस्थित होते. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष अनिल देशमुख यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या फोटोचे पूजन व हार अर्पण करून सुरुवात झालेल्या या कार्यक्रमाच्या सुरुवातीला छात्र सेनेच्या ध्वजाचे ध्वजारोहण होऊन विद्यार्थ्यांचे पथसंचलन झाले व मान्यवरांना मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारीरिक शिक्षक पी.एम.भुजाडे यांनी केले तर स्काऊट गाईडचे शिक्षक जी.जी.देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन प्रा.उमेश कडू व राजेंद्र अवथळे, मनीष कडू यांनी केले तसेच प्राचार्य अजय देशपांडे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षण कालावधी वाढवून द्या !

## आ.प्रविण तायडेंना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि.2 )**– मुख्यमंती युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षक तसेच महाराष्ट्रातील सर्व प्रशिक्षणार्थी युवक, युवतीचा कार्यकाळ वाढवून देण्याची मागणी आदर्श मल्हार बहुजन सेना ऑल इंडिया संघटनेकडून करण्यात आली आहे. याकरिता संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून आ.प्रविण तायडेंना निवेदन देण्यात आले.



निवेदनात सांगण्यात आले की, आम्ही सर्व मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी असून सर्व विभागाच्या आस्थापनांवर सहा महिन्याच्या कार्यकाळाचे प्रशिक्षण घेत आहेत. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थींचा कार्यकाळ वाढवून आम्ही प्राथमिक व माध्यमिक शाळेत तसेच विविध विभागांमध्ये जॉब करत आहोत. तेथेच आम्हाला कार्य कायम सेवेची संधी देण्यात यावी, ज्या प्रकारे आम्ही विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील सर्व लाडके भाऊ व लाडके बहीण आपल्या पाठीशी भक्कमपणे उभे होतो आणि आपल्याला बहुमताने निवडून दिले. त्याचप्रकारे आपण सुद्धा आमचा कार्यकाळ वाढवून आम्ही आहोत त्याच ठिकाणी आम्हाला कायमस्वरूपी नोकरी किंवा रोजगार उपलब्ध करून द्यावा, अन्यथा आम्ही पहिले सुशिक्षित बेरोजगार होतो आणि पुढे सुद्धा बेरोजगार राह ?णार आहोत, या भीतीमुळे आदर्श मल्हार सेनेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र स्वरूपाचे रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष अभिलाल देवरे यांच्या नेतृत्वात सोनम ठाकरे, हर्षा जाले, सुवर्णा लोंदे, रुपाली धाकडके, रोषण पावडे, भैय्या चव्हाण, कांचन वाटाणे, रुपेश ठाकरे, अनिकेत नवले यांनी निवेदन दिले.

# स्व. मा.ला.गांधी जागृत विद्यालयात शिक्षक पालक सहविचार सभा



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड ( दि.2 )**– स्थानिक स्व माणिक लालजी गांधी जागृत विद्यालय येथे वर्ग 8 ची शिक्षक पालक सभा पार पडली.

या सभेत अध्यक्ष म्हणून उप मुख्याध्यापक विजय गजबे प्रमुख, अतिथी पालक प्रतिनिधी म्हणून जितेंद्र शेटीये, चेतन सरोदे, माधुरी थोटे व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमात सहायक शिक्षक अमोल कडू यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर शिस्त ठेऊन जीवन जगावे, तसेच भविष्याच्या पायरूया चढताना संस्कार रुपी लोकांचे मार्गदर्शन त्याचे पालन करावे असे सांगितले. या कार्यक्रमात जवळजवळ 170 पालक उपस्थित होते.

या वेळी प्रास्ताविक प्रशांत वडे यांनी केले व संचालन निरंजना तडस यांनी केले तर आभार माधुरी गायकवाड यांनी केले.या कार्यक्रमाचे पूर्ण नियोजन मुख्याध्यापक विजय आडे यांनी केले. याप्रसंगी विद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# श्री गोविंद प्रभू शासकीय आयटीआयमध्ये राष्ट्रीय मतदार दिन

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.2 )**– येथील श्री गोविंद प्रभू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था(आयटीआय) व महसूल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 25 जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला.




सदर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रदीप कुमार पवार उपविभागीय अधिकारी मोर्शी, कृष्णकुमार ठाकरे नायब तहसीलदार मोर्शी, आशिषजी बारस्कर महसूल विभाग मोर्शी उपस्थित होते. आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान संस्थेचे प्राचार्य कमलकिशोर फुटाणे यांनी स्विकारले. प्रशिक्षणार्थी मध्ये राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्त्व वाढविण्यासाठी संस्था स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये चित्रकला स्पर्धा निबंध स्पर्धा वकृत्व स्पर्धा इत्यादी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच सामान्य लोकांमध्ये राष्ट्रीय मतदार दिवसाची जनजागृती करण्यासाठी संस्था ते दुर्गवाडा गांव पर्यंत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व उपस्थितांकडुन मतदारांसाठी असलेल्या प्रतिज्ञाचे वाचन करून घेऊन प्रतिज्ञा दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी देशमुख व आभार प्रदर्शन शंकर अंभोरे यांनी मानले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता सर्व निदेशक, कर्मचारी, प्रशिक्षणार्थी, आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी अथक परिश्रम घेतले.

# चांदूर रेल्वे तालुक्यात घर घर संविधान उपक्रम

## बार्टीचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि.2 )** – संपूर्ण महाराष्ट्रात घर – घर संविधान उपक्रमाचे आयोजन बार्टीचे महासंचालक सुनील वारे व समाज कल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरिया यांच्या निर्देशानुसार करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून चांदूर रेल्वे तालुक्यातील सातेफळ येथील विद्यामंदिर विद्यालयामध्ये भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त घर – घर सविधान अंतर्गत प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव एन. पी. मानवटकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था बार्टीचे समतादूत सलीम खान पठाण हे होते. प्रमुख पाहुणे सलीम खान पठाण यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले आणि यानंतर मूलभूत हक्क आणि कर्तव्य या विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव, मुख्याध्यापक एन.पी.मानवटकर यांनी संविधान जनजागृती ही काळाची गरज असल्याचे मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाची सांगता भारतीय संविधानाच्या उद्देशिका सामूहिक वाचनाने करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम.एम.वाळके यांनी केले तर आभार प्रदर्शन एस. जी. कडू यांनी केले. सदर कार्यक्रम सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अमरावती राजेंद्र जाधवर आणि जिल्हा प्रकल्प अधिकारी अमरावती विजय वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या कार्यक्रमाला विद्यार्थी शिक्षक नागरिक यांनी चांगला प्रतिसाद दिला, या कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. याशिवाय अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, तुळजापूर येथे सुध्दा घर घर संविधान अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संविधान जागृती करण्यासाठी तुळजापूर गावामध्ये रॅलीचे आयोजन करण्यात आले तसेच जि. प. प्राथमिक शाळा, तुळजापूर येथे भेट देऊन मतदार जागृतीची शपथ घेण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका किरण मेश्राम होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून बार्टीचे समतादूत सलीम पठाण खान तसेच माजी प्राचार्य प्रसेनजित तेलंग, शाळेचे अधीक्षक नवघरे आदी उपस्थित होते.



# श्रीमती नरसम्मा महाविद्यालयात वाणिज्य उत्सव

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.2 )**– स्थानिक किरण नगर येथील श्रीमती नरसम्मा कला वाणिज्य महाविद्यालयात वाणिज्य विभागातर्फे दर वर्षीप्रमाणे यंदाही वाणिज्य उत्सव जल्लोषात साजरा झाला. या वाणिज्य उत्सवाला यावर्षी दहा वर्षे पूर्ण झाले.



या सात दिवसाच्या उत्सवामध्ये विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले जाते व विद्यार्थी मोठ्या उत्साहाने या स्पर्धांमध्ये सहभागी होतात. 25 जानेवारी सुरु झालेल्या या सप्ताहाचा 31 जानेवारी रोजी समारोप झाला. या सात दिवसाच्या सप्ताहात वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये निबंध स्पर्धा, शब्दकोडे स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, बिझनेस प्लॅनिंग, वकृत्व स्पर्धा, वन मिनिट टास्क, बिजनेस स्टोरीज, स्टार्ट अप टू सक्सेस लोगो आणि स्लोगन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, पोस्टर मेकिंग, प्रॉडक्ट डिझाईनिंग, कल्चरल इव्हेंट अश्या विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, मानसिक तसेच शारीरिक विकास साधण्याकरिता या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी वाणिज्य उत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश चंदनपाट तसेच मराठी विभागाचे डॉ.पंकज वानखेडे व वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक निखिल मोहोड व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. त्यानंतर सात दिवसाच्या या स्पर्धांमध्ये विविध परीक्षक स्पर्धांचे परीक्षण करण्यासाठी उपस्थित होते. वाणिज्य उत्सवाच्या समारोपिय कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक तसेच अतिथी म्हणून संस्थेचे अध्यक्ष शेखर भोंदू, प्रमुख अतिथी प्रा.डॉ.महेंद्रसिंग पवार, प्रा.डॉ.नवल पाटील व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.राजेश चंदनपाट उपस्थित होते. शेखर भोंदू यांनी घेण्यात आलेल्या स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी किती आवश्यक आहे हे सांगितले. स्पर्धेमध्ये प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भार्गवी मिसाळ व आचल जवणे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वराज ठाकरे व पाहुण्यांच्या परिचय प्रा. निखिल मोहोड तसेच आभार प्रदर्शन श्वेता मेहेरे आणि सृष्टी गोमेकर यांनी केले.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळी नतमस्तक

## बच्चु कडुंचे तरूणाईसोबत श्रीमान ‘रायगड’ दर्शन ■ शिवरायांचे जीवन प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी –बच्चु कडु

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर( दि.2 )** – शिवरायांच्या जीवनातील संघर्ष, दूरदृष्टी, व स्वराज्य स्थापनेमागील त्यांची मेहनत यावर बच्चु कडु यांनी युवकांना संबोधित करताना शिवरायांचे जीवन हे प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत आजच्या तरुणाईने शिवरायांच्या स्वाभिमान, कष्ट आणि नेतृत्वाच्या गुणांचा आदर्श घेतला पाहिजे. देश आणि समाजासाठी जबाबदारी स्विकारण्याची तयारी ठेवली पाहिजे, असे विचार माजी राज्यमंत्री बच्चु कडु यांनी हिंदवी परिवार आयोजित हिवाळी मोहीम रायगड परिक्रमा ते तळागड या तीन दिवसीय मोहीमेच्या प्रारंभी युवकांना संबोधीत करताना केले. डॉ शिवरत्न शेटे व दुर्ग अभ्यासक



श्रीकांत कासट यांच्या माध्यमातून हजारो युवक 31 जानेवारी ते 2 फेब्रुवारी दरम्यान रायगड परिक्रमा करत सहभागी झाले.

माजी राज्यमंत्री बच्चु कडु यांनी युवकांसोबत ऐतिहासिक रायगडावर आयोजित या कार्यक्रमात सहभागी झाले. या दौऱ्यादरम्यान त्यांनी शिवरायांच्या पराक्रमाचा गौरव करत युवकांना प्रेरणा देणारे प्रबोधन केले.रायगड किल्ल्याला भेट देण्यासाठी महाराष्ट्रभरातून 1000 हून अधिक युवक एकत्र आले होते. दौऱ्याची सुरुवात गडाच्या पायथ्याशी शिवरायांच्या चरणी पुष्पांजली अर्पण करून झाली. यानंतर युवकांनी एकत्रितपणे गड चढत त्यानंतर गडावर शिवाजी महाराजांचा सिंहासन आसन असलेल्या जागेचे दर्शन घेण्यात आले.

बच्चू कडू यांनी शिवरायांच्या प्रशासनातील पारदर्शकता, लोकाभिमुखता आणि तटस्थ विचारांची उदाहरणे देऊन युवकांना मार्गदर्शन केले. त्यांनी पर्यावरण रक्षण, स्वच्छता, आणि ग्रामीण भागातील युवकांचे सक्षमीकरण, शिवरायांचे त्रिकालाबाधित धोरण, तटरक्षण, स्त्री सन्मान, शिवरायांचे अविश्रांत कार्यप्रणाली यातून आजच्या तरुणाने एक चांगला आदर्श घेऊन नव महाराष्ट्र निर्माण करावा. शैक्षणिक अडचणी, बेरोजगारी, आणि सामाजिक विषयांवर चर्चा झाली. बच्चु कडु यांनी युवकांना सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला देत, त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

दौऱ्याच्या शेवटी, गडावर स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ करण्यात आला. बच्चु कडुंच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कार्यक्रमामुळे युवकांमध्ये नवचैतन्य संचारले. यावेळी संजय गोमकाळे, उमेश कपाळे, गणेश उईके, मंगेश लेंडे, आकाश खुरद, मनोज भोजने, स्वप्नील मोहोड, वैभव करडीकर, अभिजीत ठाकरे, विशाल आवारे, विवेक सोसे, देवा कडु, हिंदुराज रोडे, आयुष खापरे, संकल्प अढाऊ, समर्थ धर्माळे व हिंदवी परिवाराचे असंख्य सदस्य सहभागी झाले होते.

# ग्रामीण पत्रकारांच्या विविध समस्या शासन दरबारी मांडा !

## आमदार प्रवीण तायडे यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.2 )**– ग्रामीण पत्रकारांच्या विविध समस्या या शासन दरबारी मांडाव्या या मागणीकरिता अचलपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार प्रवीण तायडे यांना बातमीदारांच्या एका शिष्टमंडळाने निवेदन दिले.



सादर केलेल्या निवेदनात पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या घटनांवर पोलीस प्रशासनाकडून त्वरित कारवाई व्हावी, जेणेकरून ते निर्भयपणे आपले कार्य पार पाडू शकतील, ग्रामीण पत्रकारांना पंतप्रधान आवास योजना किंवा इतर सरकारी योजनेंतर्गत घरे उपलब्ध करून द्यावीत, पत्रकारांना एस.टी. बस व रेल्वे प्रवासात मोफत किंवा सवलतीच्या दरात उपलब्ध करावा, पत्रकारांच्या मुलांना उच्च शिक्षणासाठी विशेष सवलती दिल्या जाव्यात, पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अचलपूर–परतवाडा जुळ्या नगरीमध्ये एकही पत्रकार भवन उपलब्ध नाही, त्यामुळे पत्रकारांसाठी एक कायमस्वरूपी सभागृह उपलब्ध करून द्यावे, अचलपूरमधील चौधरी मैदान व शहीद भगतसिंग उद्यानाचे सौंदर्यीकरण करावे, तसेच मुलांसाठी खेळाच्या जागा उपलब्ध करून द्याव्यात आणि शहर अधिक स्वच्छ व सुंदर बनवण्यासाठी प्रयत्न करावेत, ग्रामीण पत्रकारांसाठी मानधन व निवृत्तीवेतन योजना सुरू करण्यात यावी. निवेदन देताना पत्रकार मो. अजहरुद्दीन, इरशाद अहमद, फिरोज खान, सागर पुरोहित, सय्यद असलम आदींची उपस्थिती होती.